मुद्रा यशोगाथा
नाव :- श्री.प्रविण पांडुरंग कांबळे, जि.चंद्रपूर
व्यवसाय :- मोबाईल विक्रेता

पंतप्रधान मुद्रा बँक योजनेमुळे स्वत:चा धंदा सुरु करता आला.

लाभार्थ्यांचे मनोगत :- एमएससी शिक्षण झाल्यानंतरही नौकरी मिळत नव्हती. मी घरात सर्वात अधिक शिकलेला असल्यामुळे त्यांची अपेक्षा पूर्ण न केल्याचे दु:ख होत होते. मात्र सगळयांना माझ्या नोकरी मिळणार नाही. त्यामुळे मी सुरुवातीला एका ॲटोमोबाईल्स दुकानामध्ये कामगार म्हणून सुरुवात केली. मात्र त्याचवेळी स्वत:चा काहीतरी उद्योग सुरु करण्याचे माझ्या मनात होते. २००२ मध्ये मोबाईल सिम विकण्याचा व्यवसाय सुरु करण्याचे माझ्या मनात आले. सुरुवातीला रिकामा खोका रस्त्याच्या बाजूला एका मित्राने दिला. दरम्यानच्या काळात हैद्राबाद, मुंबई, लखनौ या ठिकाणी जाऊन परिक्षा देणे चालूच होते. काही काळ एलआयसी एजंटही झालो. लोकांचा संपर्क वाढत होता. मग मोबाईल सिम विकतांना मोबाईल हॅन्डसेटही ठेवणे सुरु केले. हळूहळू व्यवसायाला गती येत गेली. चांगल्या ठिकाणी मोबाईलचे दुकान थाटले. त्यावेळी पहिल्यांदा मुद्राचे लोन घेतले. शिशू गटातील ५० हजाराचे लोन मिळाले. आधीच्या धंद्यामध्ये कमावलेल्या रक्कमेतून मोबाईल घेतले. ५० हजाराच्या लोनमधून फर्निचर घेतले. परत लगेच परफेड केली. त्यामुळे बँकेने मला ५ ते १० लाखाच्या गटातील कर्जासाठी पात्र ठरवले. आता झक्कास दुकान सुरु झाले आहे. मी मुद्रा योजनेचा लाभार्थी असून नव्या तरुणांना योग्य प्रकारे लोन घेऊन परतफेड करण्याची विनंती करतो.

------------